WATER NOC
DE. 30/6/08

3816

जा.क्र.पुपावि/प्रशा-१/करारनामे/ /२००८

कार्यकारी अभियंता
पुणे पाटबंधारे विभाग, पुणे-१
दिनांक 30 जून JUN 2008

प्रति,
मॅनेजर,
फ्लॅगशिप इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.
हिंजवडी ता.मुळशी जि.पुणे.

विषय: मुळा नदी हिंजवडी को.प.बंधा-यातून पिण्यासाठी व औद्योगिक वापरासाठी पाणी परवानगी मिळणेबाबत.

संदर्भ:- शासन पत्र क्र.संकिर्ण २००६/(७८७/२००६)सिं.व्य.(धो) दि.१८.६.२००८

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेस औद्योगिक वापराकरिता मुळा नदीवरील हिंजवडी को.प.बंधा-यातून पाणी घेण्यास खालीलप्रमाणे मंजुरी देण्यात आलेली असून कराराच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	पाणी वापरा तपशील	एकूण वार्षिक पाणी मंजुर (द.ल.घ.मी.)
१	पिण्यासाठी	१.३२६
२	औद्योगिक वापरासाठी	०.४२६
	एकूण	१.७५२

१) अर्जदार संस्था स्वखर्चाने संबंधित योजना कार्यान्वित करेल.

२) शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या पाणीपट्टीच्या दराने पाणी पुरवठयाची ~~आकारणी केली जाईल आणि विहित मुदतीत ही पाणीपट्टी आकारणी अर्जदार संस्थेने या~~ कार्यालयात भरावी लागेल.पाणीपट्टीची आकारणी ही एकूण पाणी वापरावर शासकीय नियमानुसार करण्यात येईल.एकूण पाणी वापरात प्रत्यक्ष पाणी वापर बाष्पीभवन व्ययाचा अंतर्भाव राहील.

३) योजनेत वापरलेल्या पाण्यातील काही भाग वापरानंतर दूषित स्वरुपात जलाशयात /कालव्यात/ नदीत सोडले न जाण्याची व्यवस्था अर्जदार स्वखर्चाने करेल व त्याबाबत अर्जदार पूर्णत: जवाबदार राहील.अशा प्रकारे वापरलेल्या पाण्याची शुध्दीकरण व्यवस्था अर्जदार संस्था स्वखर्चाने करेल व त्याची विल्हेवाट लावण्याचे संदर्भात महाराष्ट्र जल प्रदुषण मंडळाचे '' ना हरकत प्रमाणपत्र '' सादर करावेत.

४) पाणी पुरवठयाचे तसेच योजनेच्या बांधकामाचे संबंधात शासनाकडील पाटबंधारे विभागाचे प्रचलित नियम तसेच शासनाने वेळोवेळी मंजूर केलेले नियम व अटी अर्जदार संस्थेवर बंधनकारक राहतील.

५) ही मंजूरी म्हणजे पाणी पुरवठयाची हमी नव्हे.नैसर्गिक किंवा इतर काही अपरिहार्य कारणामुळे नदीत/कालव्यात पाणी कमी पडल्यास मंजुर पाणी पुरवठयाबाबत शासन जबाबदार राहणार नाही. कमी पाणी उपलब्धतेच्या वर्षात त्या वर्षापुरती मंजुर

पाणी पुरवठ्यात कपात करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील. कोणत्याही प्रकारच्या नुकसानीची जबाबदारी या कार्यालयावर राहणार नाही.

६) नदीतील /जलाशयातील पाण्याचा दर्जा /गुणवत्तेबाबत पाटबंधारे विभाग जबाबदार राहणार नाही व त्यास जबाबदारही धरता येणार नाही.

७) पाणी नदीतून थेट उचलावे लागेल. नदीचे निम्न पातळी तलांकापर्यंत पाणी जॅकवेलमध्ये घेण्याची व्यवस्था करावी लागेल व या आराखड्यास या कार्यालयाची पुर्वसहमती घ्यावी लागेल .तसेच दोन महिने पुरेल इतक्या साठवण क्षमतेचा तलाव संस्थेने स्वखर्चाने बांधावा.

८) जलमापनाची व जलमापन मीटर व्यवस्था अर्जदार संस्थेस स्वखर्चाने करावी लागेल व ती व्यवस्था वारंवार तपासण्याचा अधिकार शासनास राहील या मीटरवर आधारीत पाणी वापराचा दैनंदिन अभिलेख संस्थेने ठेवावा.हा अभिलेख शासनाचे अधिकारी केव्हाही पाहू शकतील हा अभिलेख नीट ठेवल्याचे दिसून न आल्यास प्रत्यक्षात केलेल्या पाणी वापरासंबंधीचा अंदाज हे कार्यालय ठरवील व हा अंदाज अंतिम राहील व अर्जदार संस्थेवर तो बंधनकारक राहील.

९) पाणीपट्टी वेळेत न भरल्यास पाणी पुरवठा खंडित करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.

१०)अर्जदार संस्थेस पाणीपट्टी सोबत २० टक्के स्थानिक उपकर भरावा लागेल.

११)करारनाम्यातील व ज्ञापनातील सर्व शर्ती व अटींचे तंतोतंत पालन करुन शासनास सहकार्य करावे. करारनाम्यातील कोणत्याही अटींचा/शर्तीचा भंग झाल्यास करारनामा रद्द करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

कार्यकारी अभियंता
पुणे पाटबंधारे विभाग
पुणे-१

२

प्रत :- मा.अधीक्षक अभियंता,पुणे पाटबंधारे मंडळ,पुणे-११ यांना माहितीसाठी
~~सविनय सादर~~
सहपत्र: करारनामा प्रत-१

प्रत:- उपविभागीय अभियंता,खडकवासला कालवा उपविभाग, क्र.२ पुणे यांना
माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
सहपत्र: करारनामा प्रत-१

प्रत:- विभागीय लेखापाल,लेखाशाखा यांना माहितीसाठी
सहपत्र: करारनामा प्रत-१(अनामत रकमेचे कागदपत्रासह)

प्रत:- शाखाधिकारी पिरंगुट पाटबंधारे शाखा यांना माहितीसाठी व पुढील
योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना
सहपत्र : करारनामा प्रत-१